# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा क्र. तंशिविकापु/विवि/२०१९/1267
दिनांक 19 MAR 2019

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :-महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करण्यात आलेल्या शुल्कामध्ये दुरुस्ती/बदल करणे बाबत..
संदर्भ :- शासन परिपत्रक क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२७८/तांशि-४ मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२ दिनांक १०/०१/२०१९

सोबत शासन परिपत्रक क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२७८/तांशि-४ मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२ दिनांक १०/०१/२०१९ जोडले असून सदर परिपत्रकाचे अवलोकन करावे.

या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, ज्या संस्थांचे शैक्षणिक शुल्क व विकास शुल्क महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने मंजूर करण्यात आले आहे परंतु त्यामध्ये दुरुस्ती करावयाचा आहे अशा संस्थानी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे त्या बाबतचा प्रस्ताव खाली नमुद केलेल्या कागदपत्रांसह या कार्यालयास दिनांक २६/०३/२०१९ पर्यंत खास दुता मार्फत हस्तदेय सादर करावा.

प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे :-

१. शुल्क मंजूरी बाबतचे शुल्क नियमाक प्राधिकरणाचे पत्र.
२. प्रवेशित विद्यार्थ्याकडुन आकारण्यात आलेल्या फीच्या पावत्या,
३. विद्यार्थ्याकडून आकारण्यात आलेल्या फीबाबतचे बॅक स्टेटमेंट
४. शुल्क दुरुस्तीबाबत मंजूर करण्यात आलेल्या व बदल करावयाच्या शुल्काबाबतचा तक्ता

उपरोक्त प्रमाणे शुल्क दुरुस्ती बाबतचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत संस्थेच्या संस्थाप्रमुखंची असून, मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

19.3.19
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

महाडीबीटी पोर्टलवर संस्थांनी नोंदविलेल्या
शुल्कामध्ये बदल न करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२७८/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०१९

वाचा :- १) महाडीबीटी पोर्टलवरील विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनेबाबत मा.मुख्य सचिव यांनी दिनांक २९/१२/२०१८ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.
२) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-एफआरए/शा.पत्र/२०१९/१२, दिनांक ०७/०१/२०१९

परिपत्रक :

व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती अस्तित्वात असताना समितीच्या निर्देशानुसार तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाचे शुल्क मंजूर झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ ते २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये व्दितीय वर्षापासून ८ टक्के शुल्क वाढ देण्यात येऊन वाढीव शुल्क अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू होते. सदर वाढ ही शैक्षणिक तसेच विकासात्मक शुल्कामध्ये अपेक्षित होती. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम, २०१५ नुसार शुल्क नियामक प्राधिकरण अस्तित्वात आल्यानंतर अधिनियमातील कलम १४ (६) नुसार शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्य केलेले शुल्क त्या शैक्षणिक वर्षात त्या विनाअनुदानित संस्थेत प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत लागू असून संबंधित संस्थेतील अशा विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत तेच शुल्क लागू राहणार आहे.

२. आपले सरकार महाडीबीटी पोर्टलमध्ये संस्थांनी भरलेल्या शुल्काची पडताळणी करताना अनेक संस्थांनी तत्कालीन शिक्षण शुल्क समितीच्या निर्देशाप्रमाणे शैक्षणिक शुल्क तसेच विकासात्मक शुल्क यामध्ये शुल्क वाढ घेतलेली नाही. तत्कालीन समितीने / प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षा संस्थांनी भरलेले शुल्क कमी असल्यास सदर शुल्कास प्राधिकरणामार्फत मान्यता दर्शविण्यात आलेली आहे. तथापि, आता अनेक संस्था त्यांनी पोर्टलवर भरलेले शुल्क कमी अथवा चुकीचे असल्याने ते प्राधिकरणाने मागे घ्यावे (Revoke) अथवा नामंजूर करावे (Reject) अशी मागणी करीत आहेत. सद्य:स्थितीत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी संबंधित शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची संस्थाकडून छाननी करुन विभागीय कार्यालयांकडे व विभागीय कार्यालयांकडून छाननी केलेले अर्ज तंत्र शिक्षण

संचालनालयास प्राप्त होत असून त्यानुसार त्याचे ऑनलाईन देयक तयार करण्याची प्रक्रिया सुरु असून लाभ वितरीत करण्याची कार्यवाही देखील करण्यात आली आहे.

३. वरील वस्तुस्थिती विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संस्थेने जरी पूर्वीच्या शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये देय असलेली ८ टक्के वाढ विचारात घेऊन महाडीबीटी पोर्टलवर शिक्षण शुल्क भरले नसल्यास त्यामध्ये कोणताही बदल करण्यास परवानगी न देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. मात्र शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता वितरीत करण्यापूर्वी ज्या ज्या संस्थांनी शुल्क बदलाबाबत मागणी केली आहे अशा संस्थांनी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घेतले आहे हे विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांच्याकडून तपासून त्याप्रमाणे प्रत्यक्षात संस्थेने विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या शुल्काप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर बदल करण्याची संधी देण्यात येत आहे. या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण व सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०११०११०७०१८६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2019.01.10 15:29:49 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, रु.न.३०५, ३ रा मजला, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य , मुंबई

**प्रत :**

१. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
३. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे